मंगळवार, दि. ६ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २७१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ठेवीदारांच्या संघर्षाला न्यायाची दिशा

## ज्ञानराधा प्रकरणात ठेवीदारांच्या अर्जावर आठ दिवसांत निर्णय देण्याचा हायकोर्टाचा ऐतिहासिक आदेश



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** राज्यभरात गाजलेल्या ज्ञानराधा आर्थिक घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर, हजारो ठेवीदारांचे न्यायासाठीचे वाटचाल थांबली नव्हती. नुकतेच औरंगाबाद खंडपीठाच्या ऐतिहासिक निकालामुळे या वाटचालीला नवा उजेड मिळाला असून ठेवीदारांच्या आशांना नवा जीव मिळाला आहे.

जालना जिल्ह्यातील परतुरचे भगवान श्रीरंगराव खंडागळे व अन्य सुमारे १५० ठेवीदारांनी संयुक्तपणे दाखल केलेल्या फौजदारी रिट याचिकेवर आज उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सुनावणी करत ठोस आदेश दिला. या आदेशानुसार, जालना जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक (उत्तरदायी क्र. ४) व जिल्हाधिकारी (उत्तरदायी क्र. ८) यांनी दिनांक २० ऑक्टोबर २०२४ रोजी ठेवीदारांकडून दाखल करण्यात आलेल्या अर्जाचा निर्णय आठ दिवसांच्या आत घ्यावा, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

या अर्जात ठेवीदारांनी चार प्रमुख मागण्या मांडल्या होत्या. १. एम. पी. आय. डी. कायद्यातील कलम ५ मधील तरतुदि प्रमाणे सक्षम

### ॲड. अविनाश औटे यांच्या मार्फत दाखल याचिकेला अल्पावधीत यश

### ठेवीदारांमध्ये नवचैतन्य

अधिकरी (Competent uthority) यांची नियुक्ती करावी.२. ज्ञानराधा व कुठे उद्योगसमूहाच्या मालमत्ता सह प्रवर्तक संचालक भागीदार व्यवस्थापक किंवा सदस्य या सर्वांच्या जंगम अवस्था वर मालमत्ता त्वरित जप्त करावे व ठेवीदारांचे ठेवी त्वरित एम. पी. आय. डी. कायद्याच्या तरतुदीप्रमाणे वितरित करावे.३. भविष्यात अशे प्रकार होऊ नये म्हणून महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ सप्टेंबर २०१७ रोजी काढलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करावी. ४. ज्ञानराधा आणि कुटे समूहाच्या सर्व आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्यासाठी एक स्वतंत्र तपासणी समिती गठित करावी. व दोषी व्यक्तींवर तात्काळ आणि कठोर कार्यवाहीसाठी विनंती केली होती,

जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना निवेदन देऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नव्हती त्यामुळे फिर्यादीचे वतीने माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे फौजदारी रीट याचिका दाखल करण्यात आली होती.

सदरील याचिका ॲड. अविनाश आनंदराव औटे व त्यांच्या मार्फत दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी दाखल करण्यात आली होती. केवळ आठ दिवसांत, म्हणजे २९ एप्रिल रोजी न्यायालयाने यावर निकाल देत ठेवीदारांच्या बाजूने स्पष्ट आदेश दिले. याचिकेदरम्यान ॲड. अविनाश औटे यांचे सह ॲड. गजानन क्षीरसागर यांनीही प्रभावी बाजू मांडली त्यांना ॲड. ऋतुजा जगताप, ॲड. सचिन कुंटे यांनी सहकार्य केले. शासनाच्या वतीने ॲड. ए. डी. वांगे यांनी प्रतिवाद सादर केला.

न्यायालयाने सुनावणीदरम्यान स्पष्टपणे नमूद केले की, ठेवीदारांच्या अर्जावर आठ दिवसांच्या आत निर्णय घेणे अनिवार्य असून ही बाब संबंधित अधिकाऱ्यांची 'प्रतिज्ञा' म्हणून नोंदवण्यात आली आहे. यामुळे या आदेशाला विशेष गांभीर्य प्राप्त झाले आहे. या निकालामुळे संपूर्ण ठेवीदारांमध्ये **पान २ वर**

युवा आदर्श

### वगळा ...

तपासा कोण अपात्र
खुशालत्यांना वगळा
नियम असावे कडक
न्याय नसावा वेगळा
सुयोग्य जनांलालाभ
योजनेचा हेतू सगळा
साळसूद सुळसुळाट
फायदा घेतो बगळा
मिडीया लावतात टेप
विषय दिसभर चघळा
दोष काढत स्कीमचा
तेच तेच सतत उगळा
पाहतोय भाग काळा
कावकाव करे कावळा
रेटून दाखववावे पटवून
गोंधळ चालला सावळा
प्रकल्प चालण्याआधि
आडवा पडतो अर्गळा
योजनेचा कळावा हेतू
तुटून पडाव्या शृंखळा
कुठल्या योजनेत घुसू
गुळा शोधतोयं मुंगळा
भ्रष्टावून टाकते स्कीम
नावा निराळा मोकळा
बंद ना पडावी योजना
नाजूक क्षणा सांभाळा
नाती जोडून जमिनीशी
गवसणी घाले आभाळा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा





**बहुजन समाज पार्टीच्या वतीने जालना महानगर पालिकेवर विविध मागण्यासाठी जिल्हाध्यक्ष सुधाकर निकाळजे यांच्या नेतृत्वाखाली धडक मोर्चा काढण्यात आला. (छाया । जावेद तंबोली)**

# गांधीनगरात अवतरली नदी!

## तात्काळ उपायोजना न केल्यास आंदोलनाचा ईशारा

**जालना । प्रतिनिधी -** गांधीनगर भागातील सिमेंट रस्त्याच्या काम सध्या थंड बस्त्यात असून परिणामी सोमवार (दि ५) दुपारी झालेल्या जोरदार पावसामुळे मुख्य रस्त्यावर नदी अवतरल्याचा प्रत्यय गांधीनगर वासियांना आला आहे. या संदर्भात तात्काळ उपाययोजना न केल्यास आंदोलनाचा ईशारा सामाजिक कार्यकर्ते अमजत खान यांनी दिला आहे. रस्त्यावरील घाण महानगर पालिकेत आणून टाकण्यात येईल असेही अमजत खान यांनी यावेळी म्हटले आहे.



शहरात वादळीवाऱ्यासह काही ठिकाणी गरपीट झाली. यामुळे शहरातील गांधीनगर भागात मुख्य रस्त्यावर पाणीच पाणी साचले होते. या भागात रस्त्याच्या कामामुळे रस्ता खोदून ठेवला आहे. त्यामुळे नदीचे स्वरूप दिसून येत होते. मनपाने अतिक्रमणाच्या नावाखाली नागरिकांची घरे तोडण्याचे काम तत्परतेने केले. याच तत्परतेने सिमेंट रस्त्याचे काम करणे अपेक्षित असतांना यासाठी मात्र अद्यापही गुत्तेदार मुहूर्ताची वाट पाहत आहे आणि मनपा प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे. दोन दिवसांपुर्वीच मनपा प्रशासनाला गांधीनगरवासियांनी निवेदन देत रस्त्याचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत निवेदन दिले होते. यावर मनपा प्रशासनाकडून दोन दिवसात काम सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. असे असले तरी अद्याप काम सुरु न झाल्याने गांधीनगर वासियांत नाराजी पसरली आहे.

उदघाटन होऊन दीड ते दोन महिने उलटले असून ररस्त्याचे काम ठप्प असल्याने नागरिकांना ये-जा करतांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसामुळे त्यात अधिकच भर पडली असून आता नागरिकांना कशा पद्धतीने ये-जा करावे असा प्रश्न अमजत खान यांनी उपस्थित करत मनपा प्रशासनाने तात्काळ उपाययोजना न केल्यास आंदोलनाचा ईशारा अमजत खान यांनी दिला आहे.

# नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयाच्या उज्वल निकालाची परंपरा कायम

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** शहरातील नवभारत शिक्षण संस्थेच्या श्रीमती जे बी के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इ१२वी बोर्ड परिक्षेचा कला व विज्ञान शाखेचा निकाल ७६.८२% लागला असुन कला शाखेत १४६ प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ८९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून हे प्रमाण ६०.९५%आहे.कला शाखेत कु. ऋतूजा दत्तात्रय वरगणे हिने ८२.३३%गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला आहे ,तर वैशाली संतोष खांडेभराड हिने ७५.६७%घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला आहे, कु. कल्याणी ज्ञानेश्वर नवले ६९.६७% तृतिय क्रमांक, कु.आकांक्षा राजेंद्र काळे- ६६.00%, कु.किर्ती विजय तायडे ६१.८३%,तर कु. सानिया मुसा शेख ६१.६७%गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे, विज्ञान शाखेत:-गौरव अरूण आहेर याने८५.३३%गुण घेऊन विद्यालयातुन प्रथम क्रमांक पटकावला आहे. कु. गौरी अरूण आहेर हिने ८४.८३%गुण घेऊन **पान २ वर**

# सेवलीचे माध्यमिक शिक्षक बाळासाहेब ठाकरे सेवानिवृत्त



**जालना । प्रतिनिधी -** विद्यार्थ्यांचे लाडके शिक्षक बाळासाहेब येडुबा ठाकरे नियत वयोमानापरत्वे सेवानिवृत्त होत झाले आहेत. त्यानिमित्त लोकमान्य टिळक विद्यालय सेवली येथे सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री जाधव, जाधव मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी लोढे मॅडम, संस्थेतील सेवानिवृत्त शिक्षक, परिसरातील राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातून आलेली मान्यवर मंडळी, सर्व नातेवाईक ,आप्तेष्ट , शाळेचे सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी श्रीमान बाळासाहेब ठाकरे व त्यांच्या पत्नी अन्नपूर्णा ठाकरे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अनेक मान्यवरांनी सराविषयी प्रतिक्रिया व्यक्त केल्या व त्यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याची माहिती दिली. संपूर्ण कार्यक्रम होईपर्यंत सरांचा वैयक्तिक सत्कार करण्यासाठी मंचकावर लोकांची व विद्यार्थ्यांची अक्षरशः रीघ लागली होती, शेवटी काकांनी सत्कासमारंभाला उत्तर देत असताना त्यांच्या भावना अनावर झाल्या.. उपस्थितांचे सुद्धा डोळे पाणावले होते. खरंच सर तुम्ही केलेल्या कार्याची ही पावतीच होती नंतर सर्वांसाठी सुरुची भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतून जमा झालेला प्रचंड जनसमुदाय पाहून भारावून गेलो. आणि अलगत तोंडातून शब्द निघाले You are Great आपण शिक्षण क्षेत्रासाठी, संस्थेसाठी केलेल्या कार्याची उंची आम्हाला त्यातून समजली. तुमचे कार्य निश्चितच आमच्यासाठी प्रेरणादायी राहणार आहे.

# संपादकीय

## लोककल्याणकारी राजा

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची आज १०३ वि पुण्यतिथी. आजच्याच दिवशी १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नाम करण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधमतील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. पुण्यतिथीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# अप्रतिष्ठित लोकांसोबत वाद घालण्यात काय अर्थ?

आजकाल समाजात व गावात अप्रतिष्ठित लोकांचा सुळसुळाट फार वाढला आहे. ज्यांना समाजात व गावात कवडीचीही किंमत नसते, तीच माणसे प्रतिष्ठित माणसांसोबत जाणीवपूर्वक वाद घालून त्यांना आपल्या पंगतीला आणून बसवण्याचा प्रयत्न करतात. त्यांची नाहक बदनामी करून त्यांना अपमानित करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना विनाकारण डिवचून भांडण तंटा करण्यास मजबूर करतात. त्यांचे बावनकशी चारित्र्य डागाळण्याचा प्रयत्न करतात. पण ही प्रतिष्ठित व सन्माननीय मंडळी खूप हुशार व चाणाक्ष असते. ती अशा अप्रतिष्ठित लोकांच्या नादी लागून आपली प्रतिष्ठा कधीच कमी करून घेत नाही. त्यांना कितीही डिवचले, त्यांना नाहक बदनाम केले, त्यांना शिव्या घातल्या किंवा सार्वजनिक ठिकाणी अपमानित केले तरीही, ही चारित्र्यवान व प्रतिष्ठित माणसे अशा अप्रतिष्ठित लोकांकडे दुर्लक्ष करतात. त्यांना कोणतीच प्रतिक्रिया देत नाहीत. तर त्यांच्यापासून चार हात लांबच राहणे पसंत करतात. अप्रतिष्ठित माणसे खूप निर्लज्ज व निसाक असतात. त्यांना स्वतःची इज्जत आलेलीही कळत नाही आणि गेलेलीही कळत नाही. जाईल तिथे ते नुसते मच मच करतात. आपलेच रान हाणतात. शहाण्या व प्रतिष्ठित माणसात जाऊन काहीतरी वेडेवाकडे बोलतात. त्यांना काहीतरी टोमणे मारून अपमानित करतात. तेव्हा अशा प्रतिष्ठित माणसाच्या मनाला खूप खूप वेदना होतात. पण अप्रतिष्ठित लोकांना आपण कितीही अपमानित केले किंवा बदनाम केले अथवा मारले तरीही त्यांना काहीच फरक पडत नाही. कारण ते अगोदरच सूर्यफुलासारखे निसाक असतात. त्यांची आहे तेवढी इज्जत अगोदरच पाण्यात गेलेली असते. म्हणून ते इतरांनाही आपल्या बरोबरीला आणण्याचा प्रयत्न करतात. अशा अप्रतिष्ठित लोकांना समाजात व गावात कसलाच मान सन्मान नसतो. त्यांना कोणी नीट बोलायलाही तयार नसतो. ते स्वतःहून प्रतिष्ठित मंडळीत बोलायला जातात. तेव्हा प्रतिष्ठित माणसे त्यांना न बोलता त्यांच्यापासून चार हात लांब जातात. त्यांच्या सावलीलाही थांबायला तयार नसतात.

ज्या घरातील आया बहिणी खरोखरच चारित्र्यवान व शीलवान असतात व आपल्या अब्रूला प्राणपणाने जपणाऱ्या असतात, त्या घरातील स्त्रियांना जाणीवपूर्वक नावे ठेवून बदनाम केले जाते. त्यांच्या चारित्र्यावर नाहक पण मुद्दाम संशय घेतला जातो. आणि अशा चारित्र्यसंपन्न स्त्रियांना नावे ठेवणारी माणसे कधीच आपल्या अब्रूला गमावून बसलेली असतात. अशी अप्रतिष्ठित माणसे स्वतःच्या डोळ्यातील मुसळ तसेच ठेवून दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ शोधण्याचा प्रयत्न करतात. अशा अप्रतिष्ठित व चारित्र्यहीन लोकांना सांगावे वाटते की, बाबांनो चारित्र्यवान व शीलवान घरातील स्त्रियांना जाणिवपूर्वक नावे ठेवण्यापेक्षा अगोदर आपल्या घरातील चारित्र्यहीन स्त्रियांना व पुरुषांना स्वाभिमानाने व सन्मानाने जगायला शिकवा. विनाकारण प्रतिष्ठित व्यक्तींना अप्रतिष्ठित ठरवण्याचा प्रयत्न करू नका...

समाजाला व गावाला माहीत असते की, कोण प्रतिष्ठित आहे आणि कोण अप्रतिष्ठित आहे...

आजकाल जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तर अप्रतिष्ठित लोकांचाच बोलबाला ऐकायला मिळत आहे. आणि प्रतिष्ठित माणसे अप्रतिष्ठित लोकांना भिऊन एकटे दुकटे राहत आहेत.

कारण प्रतिष्ठित लोकांना माहीत असते की, अप्रतिष्ठित लोकांच्या नादी लागून आपलीही प्रतिष्ठा कमी होऊ शकते. म्हणून ते अशा लोकांना बोलायचे टाळतात.

राजकीय क्षेत्राचा विचार केला तर, जो राजकारणी खरोखर गोरगरीब, सर्वसामान्य जनतेसाठी व देशासाठी प्रामाणिकपणे काम करतो. तो राजकारणी कधीच आपल्या भाषणातून आपल्या कार्याचा गवगवा करत नाही. आपले चारित्र्य सांभाळून जनतेशी संवाद साधतो. इतर राजकीय व्यक्तींना कधीच ट्रोल करत नाही. त्यांच्यावर टीका टिप्पणी करत नाही. लोकांना अशक्य आश्वासन देत नाही. आपल्याने जे शक्य होईल तेच आश्वासन देतो. पण अशाच चारित्र्यवान व प्रतिष्ठित राजकीय व्यक्तींचा राजकारणात समावेश कमी झाला आहे. ही खेदाची बाब म्हणावी लागेल. आणि स्वार्थी भ्रष्टाचारी, चारित्र्यहीन, लबाड व ढोंगी राजकीय व्यक्तींचा राजकीय क्षेत्रात सुळसुळाट वाढला आहे. मग अशा लबाड, ढोंगी व चारित्र्यहीन व्यक्तींना प्रतिष्ठित राजकारणी म्हणावे तरी कसे?

हे अप्रतिष्ठित राजकारणी चारित्र्यवान व प्रतिष्ठित नेतृत्वाला नाहक बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्यावर भाषणातून टीकास्त्र सोडतात. लोकांना अशक्य जाहीरनामा वाचून दाखवतात. हे अप्रतिष्ठित राजकारणी कधीच जनतेशी प्रामाणिकपणे वागत नाहीत. त्यांच्यावर लोकांनी कितीही टीका केली, खालच्या थराला जाऊन बोलले, तरीही त्यांना या गोष्टीचा काहीच फरक पडत नाही. कारण त्यांची इज्जत अगोदरच मातीमोल झालेली असते. म्हणून ते कर्तृत्वान नेतृत्वाला मुद्दाम बदनाम करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. पण सुजान मतदार बांधव पण खूप हुशार असतात. ते बरोबर ओळखतात की, कोणता राजकारणी गरिबांसाठी काम करतोय आणि कोणता श्रीमंतांसाठी...



सांगायचा मुद्दा म्हणजे ज्यांना कवडीचाही मानसन्मान नसतो, सामाजिक प्रतिष्ठा नसते, तीच माणसे चौका चौकात जाऊन गर्दा करतात. सार्वजनिक नळावर पाणी भरायला गेल्यावर असे लक्षात येते की, ज्या महिला व पुरुष प्रतिष्ठित असतात, त्या बारीप्रमाणे पाणी भरतात. आपल्याने चुकी होईल असे वागत नाहीत. पण ज्या महिलांना व पुरुषांना कसलीच सामाजिक प्रतिष्ठा नसते, मानसन्मान नसतो, त्या महिला व पुरुष मात्र प्रतिष्ठित व्यक्तींबरोबर वाद घालून पाणी भरतात. कारण ते आपल्या प्रतिष्ठेला खूप घाबरतात. म्हणून ते त्यांच्या नादी कधीच लागत नाहीत. तसेच बसने प्रवास करत असताना असे लक्षात येते की, काही अप्रतिष्ठित महिला व पुरुष प्रतिष्ठित महिला व पुरुषांसोबत जागा धरण्यावरून वाद घालतात. पण प्रतिष्ठित मंडळी अप्रतिष्ठित व्यक्तीसोबत वाद घालने टाळतात. त्यांना माहित असते की, अशा अप्रतिष्ठित व्यक्तींसोबत वाद घालण्यात काहीही अर्थ नाही. त्यांच्याबरोबर आपलीही सामाजिक प्रतिष्ठा कमी होण्याच्या मार्गावर असते. म्हणून ते शेवटी उभे राहून जातात. पण वाद घालत नाहीत. हे चित्र आपल्याला कुठेही सर्रासपणे पाहायला मिळत आहे.

पण ज्या दिवशी अप्रतिष्ठित व्यक्ती प्रतिष्ठित होऊन एकजुटीने व एकमताने सामाजिक कार्य करतील, त्या दिवशी समाजाचे अनेक प्रश्न सुटलेले असतील....

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# महारक्तदान शिबीरात १३४ जणांचे रक्तदान



**जालना । प्रतिनिधी** - सदगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या असिम कृपेने महा रक्तदान शिबीराचे येथील संत निरंकारी मंडळातर्फे आयोजन करण्यात आले होते. संत निरंकारी मंडळातर्फे २४ एप्रिल हा दिव बाबा गुरुचनन सिंह महाराज यांच्या आठवणी प्रित्यर्थ मानव एकाता दिवस म्हणून साजरा केला जातो. हे रक्तदान शिबीर रविवारी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत चालले.या शिबीरात १३४ रक्तदात्यांनी सहभाग घेतला. या शिबीराचा शुभारंभ (उद्घाटन) डॉ. नितीन पवार (जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा रुग्णालय जालना) व महात्मा विजय बोडखे (क्षेत्र संचालक छ. संभाजीनगर) यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी राजकुमार पारसवानी (समन्वयक जालना आणि ज्ञान प्रवर्तक) तसेच डॉ. राजेंद्र गाढेकर (मुख्य जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा रुग्णालय जालना) यांच्यासह बहुसंख्येने पुरुष, महिला व बाल सेवेकर्यांची उपस्थिती होती.

युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी यांनी सत्यबोधाच्या माध्यमातून समाजाला समाज अंधश्रद्धा व अनिष्ठ प्रथांपासून मुक्त करुन नशमुक्ती, साधे विवाह आणि युवावर्गाला सकारात्मक विचारांशी जोडणे यांसारख्य लोककल्याणकारी अभियांनाची प्रेरक सुरवात केली. त्यांचे पावन मार्गदर्शन पुढे चालवत बाबा हरदेवसिंहजी यांनी रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नको हा अमर संदेश देऊन रक्तदानाला मिशनच्या आध्यात्मिक सेवेचे अभिन्न अंग बनवले. हा संदेश आजदेखील प्रत्येक निरंकारी भक्ताच्या हृदयामध्ये सेवा आणि समर्पणाची प्रेरक ज्योत बनून तेवत आहे. हा दिवस चाचा प्रतापसिंहजी यांच्यासह त्या सर्व समर्पित बलिदानी संतांच्या पुण्य स्मृतिचे प्रतीक आहे, ज्यांनी मानव एकता, निःस्वार्थ सेवा आणि आध्यात्मिक जागृतीच्या मार्गावर चालत असताना आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. मानव एकता दिवस त्याच संतांचा दृढविश्वास व दृढसंकल्पाची प्रेरणा जीवंत करतो.

हे महाअभियान केवळ रक्तदान नसून सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांचा करुणा, सेवा आणि एकत्वाचा संदेश जीवनात उतरविण्याचे सजीव माध्यम आहे. मानवता हाच सर्वोच्च धर्म होय. याच प्रेरणेने युक्त संत निरंकारी मिशन, सेवा आणि समर्पणाच्या पथावर निरंतर मानवतेचा मार्ग प्रशस्त करत आहे. या शिबीरासाठी डॉ. शामल गरड , शिवाजी मुजगुले (अंबड मुखी), जामखेड येथील सेवादल संचालक लखन चव्हाण, जालना संचालक सुनिल नांदोडे, रघुनाथ काळे, सुधाकर दळवी, सुनिल वाघ, किरण गरड, अनिल गुडला, सुधाकर दळवी, आरती डुरे, मनोज जाधव, विष्णु जाधव यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुरुष, महिला व बाल सेवादलाने अथक परिश्रम घेतले.

# पर्यावरण रक्षणास पूरक व आरोग्यदायी विधि; अग्निहोत्र

जगभर प्रदुषण, ग्लोबल वॉर्मिंग, विविध संसर्गजन्य आजार तसेच काही देशांत चालू असलेले युद्ध यामुळे वातावरण खूप अशुद्ध झालेले आहे. आरोग्याच्या विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. आपल्या भारतीय परंपरेत वातावरण शुद्धीसाठी पूर्वापार चालत आलेला एक विधी म्हणजेच अग्निहोत्र होय. अग्निहोत्र केल्याने वातावरणाची शुद्धी होते, हे सांगितले आहे. जर्मनी येथील अग्निहोत्राचे अभ्यासक तत्त्ववेत्ते व जर्मन असोसिएशन फॉर होम थिरपी' या संस्थेचे अध्यक्ष डॉ. उलरिच बर्क यांनी काहि महत्वाची सुत्रे मांडली आहेत. ते 'अग्निहोत्र तज्ञ' म्हणून ओळखले जातात. ते मागील ३५ वर्षे अग्निहोत्र करत असून त्याविषयावर संशोधनही करत आहेत. त्यांनी त्यांच्या अभ्यासावरुन असे म्हटले आहे की - अ. अग्निहोत्रामुळे व्यक्तीला संसर्ग होण्याची शक्यता न्यून होते. आ. जर पूर्वीच संसर्ग झालेला असेल, तर संबंधित विषाणूचा प्रभाव थोडा न्यून होतो. इ. संसर्गावर मात करण्यासाठी शरिराला साहाय्य मिळू शकते. काही दिवसांपुर्वी निवृत्त ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मोघे यांच्या अग्निहोत्र या विधी वर आधारित प्रयोगाला पेटंट मिळाले आहे ज्यातून परत एकदा आपली महान संस्कृती किती वैज्ञानिक आहे याची जाणीव होते. वेद काळापासून भारतात यज्ञ हा संस्कार अस्तित्वात आहे त्यातीलच अग्निहोत्र हा सोपा व आजच्या काळातही सहज सर्वांना करता येणारा असा यज्ञविधी डॉ. प्रमोद मोघे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या यज्ञविधीचा गेल्या ५-६ वर्षापासून वैज्ञानिक दृष्टीने अभ्यास करून विविध वैज्ञानिक कसोट्यांवर सिद्ध करत याचे फायदे जगासमोर मांडले. अग्निहोत्राच्या धुराने वातावरणातील ९०% सूक्ष्मजंतूंची वाढ थांबते. वातावरणातील प्रदूषण कमी करण्याची क्षमता अग्निहोत्रात आहे, हे हवेतील घातक सल्फर डायॉक्साईडचे प्रमाण दहा पटीने कमी करते हे प्रयोगाआधारे सिद्ध केले. वनस्पतीच्या वाढीवर याचा व यातील राखीचा चांगला परिणाम होतो व ते शेतीला अत्यंत उपयुक्त असे आहे. एवढा लाभदायी व पर्यावरणास पूरक विधी अतिशय स्वस्त व रोज फक्त दहा मिनिटं सकाळी व सायंकाळी सूर्य व अग्नीला आहुती देऊन केला जातो व हे सर्व फायदे आपण मिळवू शकतो. जगातील विविध देशांमधील नागारीक आग्निहोत्र करुन त्याचा लाभ घेत आहे व तेच सर्वत्र त्याचा प्रसार करत आहे अश्या ह्या आपल्या पूर्व पारंपारिक विधींवर जास्तीत जास्त संशोधन होउन त्याचा लाभ सर्व जनतेला व्हावा व जास्तीत जास्त लोकांनी अग्निहोत्र हा यज्ञ विविध नियमित करून त्याचा अनुभव घ्यावा हिच आपेक्षा.

**डॉ. पी. एस. महाजन, छत्रपती संभाजीनगर**

पान १ वरुन

## ठैवीदारांच्या ...

आशेचा किरण जागृत झाला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून न्यायासाठी लढा देणाऱ्या ठेवीदारांना प्रथमच हायकोर्टाच्या माध्यमातून कायदेशीर आधार मिळाला आहे. ॲड. औटे यांनी या प्रकरणात सुरुवातीपासूनच झोकून देऊन काम केले आहे - केवळ कायदेशीर पातळीवर नव्हे, तर ठेवीदारांच्या भावना लक्षात घेऊन त्यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून आंदोलनांमध्येही सक्रिय सहभाग घेतला आहे. जालना जिल्ह्यामध्ये तत्कालीन आमदार श्री. राजेश टोपे यांच्या नेतृत्वामध्ये हजारो ठेवीदारांनी मोर्चा देखील काढला होता.

या निकालामुळे शासन यंत्रणेला जबाबदारीने आणि तत्परतेने कारवाई करावी लागणार आहे. ठेवीदारांच्या पैशांची परतफेड, दोषींवर कारवाई आणि मालमत्ता जप्तीच्या प्रक्रिया यामध्ये आता गती येईल, अशी ठेवीदारांची आशा आहे. या प्रकरणात आता पुढील कार्यवाहीला वेग येईल आणि हजारो ठेवीदारांना अखेरचा न्याय मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## नवभारत उच्च ...

द्वितीय क्रमांक मिळविला आहे,तर समर्थ गजानन धोटे याने ७९.८३% गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकावला आहे.आदित्य रवींद्र सकुंडे ७२.५०% ,ओम दिपक बोराडे ७१.५०%गुण घेऊन यश संपादन केले आहे.नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय काबरा, उपाध्यक्ष. जमिर शेख सर, सचिव सत्यनारायण सोनी, कोषाध्यक्ष.सुभाष राठी, ज्येष्ठ संचालक रामनारायण काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी अध्यक्ष सुरेश शेठ काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी सचिव प्रेम सुख काबरा, संचालक तथा माजी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक राजीव काबरा, संचालक दीपक काबरा, संचालक मधुकर निकम, संचालक. संचालक विश्वनाथराव सांगोळे, संचालक प्रा. दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर , प्रदीप काबरा, प्रदीप मुळे, प्राचार्य नंदकुमार काळे, धनंजय पुराणे, सखाराम बोरकर, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक डॉ. अरुण आहेर, प्राध्यापक रामदास भांगे, प्राध्यापक कैलास जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, रमेश इंगळे विष्णू जाधव, कैलास भुतेकर राजेश शेवाळे रवींद्र मोरे राजेंद्र जगताप, संजीव कुलकर्णी, दिनकरराव उखर्डे, दत्ता उखार्डे, वासुदेव क्षीरसागर समाधान कांबळे, आवटी मॅडम पाटील मॅडम शेख मॅडम भिलावेकर मॅडम, कळंबे मॅडम, लंबे मॅडम, राजू डोमळे, दगडोबा तांबेकर, नागोराव देशमुख दीपक देशमुख सर्व शिक्षक प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी बंधु यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## वाचकांचे मनोगत

# निकाल; शाळेचा आणि जीवनाचा

विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून बारावीचा निकाल म्हणजे जीवनातील एक महत्त्वाचे वळण. आजच्या स्पर्धेच्या युगात यशस्वी होण्यासाठी केवळ हुशार असणे महत्त्वाचे नाही तर सकारात्मक दृष्टिकोन ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या टप्प्यावर अनेक विद्यार्थ्यांना भरघोस यश मिळते व यशाचा आनंदही ते साजरे करतात हे नैसर्गिकच आहे. तर काहीजण आलेल्या अपयशामुळे निराश, वैफल्यग्रस्त होतात. यश मिळाले तर 'मी केलेल्या प्रयत्नांना देवाच्या कृपेने यश मिळाले', हा भाव ठेवून कृतज्ञता व्यक्त करायला हवी. अपयश आले तरी खचून न जाता विद्यार्थ्यांनी शिकण्याच्या दृष्टिकोनातून बघून त्यातूनही शिकून पुढे जाण्यासाठी तयार व्हावे. प्रत्येक अनुभव आपल्याला काही ना काही शिकवत असतो. आपल्याला एक स्वतःमध्ये पालट करण्याची, आत्मविकास साधण्याची एक संधी देत असतो. या दृष्टीने विद्यार्थ्यांनी आपल्या बारावीच्या निकालाकडे बघायला हवे. १२ वीच्या परीक्षेत अपयश आले, म्हणजे आयुष्याच्या सर्वच टप्प्यांवर आपण अयशस्वी झालो, असे नाही. समाजात अशी अनेक उदाहरणे आहेत की, जे १०, १२ वी च्या परीक्षेत अपयशी झाले; मात्र पुढील जीवनात त्यांनी अप्रतीम यश संपादन केले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी निकालाकडे नेहमीच सकारात्मक दृष्टीने पहावे.

**- प्रा.रोहिणी जोशी, संभाजीनगर**

# विकासातून मतदारांचे ऋण फेडणार - आ. दानवे

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** आमदार संतोष पाटील दानवे यांच्या हस्ते डोलखेडा खुर्द येथे १३ कोटी रुपये किमतीच्या विविध यी विकासकामांचे उद्घाटन व लोकार्पण संपन्न.

मागील दहा वर्षाच्या काळामध्ये ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारकडून माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे साहेब यांच्या माध्यमातून मतदार संघातील गावांच्या विकासासाठी भरीव निधी मंजूर करून घेतला आणि केंद्र सरकार व राज्य सरकार आपल्याच विचाराचे असल्याम ुळे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी आणखी गती देणार असल्याचे प्रतिपादन डोलखेडा खुर्द येथे १३ कोटी रुपये किंमतीच्या विविध विकास कामांच्या उद्घाटन व लोकार्पण सोहळ्याप्रसंगी बोलत असताना केले.

पुढे बोलताना आमदार दानवे म्हणाले की, मतदार संघातील जनतेने आपल्याला तिसऱ्यांदा लोकप्रतिनिधी म्हणून बहुमताने निवडून दिले त्यांच्या या मतदान रुपी आशीर्वादामुळेच हे सर्व शक्य झाले आहे गावांच्या विकास कामाच्या बाबतीत कोणीही निसंकोच पणे माझ्याशी संपर्क साधू शकता आपल्या समस्येचे निराकरण करण्याचा



मी प्रामाणिक प्रयत्न करेन अशी ग्वाही ही त्यांनी यावेळी दिली.

यावेळी , सतीष कायंदे,मनोज पाटील शिंदे, गोविंदराव पाटील पंडित, राजेश पाटील चव्हाण,दत्तू पाटील पंडित,मधुकर पाटील गाढे, गटविकास अधिकारी खिल्लारे साहेब, जायभाये साहेब ,पाटील साहेब, दत्ता बंगाळे, मधुकर देठे, शंकर सवडे, किरण सवडे,अनिरुद्ध आनंद,गजानन पवार,निवृत्ती जाधव, नामदेव जाधव, भरत जाधव, मिथुन चव्हाण आदींसह सरपंच,उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ आणि भाजपा स्थानिक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुरेखा लहाने यांना पुरस्कार जाहीर

जाफराबाद । प्रतिनिधी - येथील नगरपंचायत च्या नगराध्यक्षा तथा राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हाध्यक्षा डॉ. सुरेखा संजय लहाने यांना ३ मे रोजी राष्ट्रमाता जिजाऊ राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

आपण आजवर शिवव्याख्यानाच्या म ाध्यमातून अविस्मरणीय सामाजिक कार्य केले आहे. या उल्लेखनीय कार्याबद्दल यंदाचा राष्ट्रमाता जिजाऊ राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचे योजिले आहे, असे डॉ. लहाने यांना दिलेल्या निमंत्रण पत्रकात म्हटले आहे. सदर पुरस्काराचे वितरण ९ मे रोजी उद्घाटन सोहळ्यात होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने ३१ वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन ९ व १० मे रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित केले केले आहे. राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.



मोठ्या संख्येने साहित्यिक व विचारवंत या संमेलनास उपस्थित राहणार आहेत. सदर पुरस्कार स्वीकारण्यासाठी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे व राष्ट्रीय उपाध्यक्ष शुभांगी काळभोर यांच्या स्वाक्षरीने नियुक्ती पत्र देऊन या सोहळ्याला निमंत्रित करण्यात आले आहे.

# फायनल मॅचमध्ये एस. डी. वॉरियर्स संघाचा विजय



**जालना । प्रतिनिधी -** भगवान परशुराम जयंतीनिमित्त भगवान श्री. परशुराम प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात आले होते त्याची आज फायनल मॅच घेण्यात आली. फायनलमध्ये एस. डी. वॉरियर्स विरुद्ध पी. एन. इंडियन्स हा सामना आज दिनांक ०५/०५/२०२५ रोजी पाठक टर्फ मध्ये रंगला. यामध्ये प्रथम पी. एन. इंडियन्स या टीम ने बॅटिंग करून सात ओव्हर मध्ये ७४ रण काढून ७५ रणाचे टार्गेट दिले तर एस. डी. वॉरियर्स ने हे फक्त ६.३ ओव्हर मधेच पूर्ण करून विजयाचा षटकार मारला. यामध्ये एस. डी. वॉरियर्स हा ४ विकेट राखून विजयी संघ ठरला त्याबद्दल त्यांना रुपये ५०००/- (अक्षरी पाच हजार रुपये ) प्रथम पारितोषिक सह ट्रॉफी देण्यात आली तर पी. एन. इंडियन्स हि टीम उपविजेता ठरल्याबद्दल त्यांना द्वितीय पारितोषिक ३०००/- ( अक्षरी तीन हजार रुपये ) सह ट्रॉफी देण्यात आली व तसेच भगवान परशुराम युवा दलाच्या वतीने सर्वांचे कौतुक आणि आभार व्यक्त करण्यात आले.

# जे. ई. एस. महाविद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

**जालना । प्रतिनिधी -** बारावी कला, वाणिज्य, विज्ञान आणि किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रमासाठी फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत जे.ई.एस. महाविद्यालयातून विज्ञान शाखेत ३०८ विद्यार्थी बसलेले होते. यापैकी २९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, विज्ञान शाखेचा निकाल ९४.८० टक्के लागला आहे. त्यापैकी ३२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. प्रथम श्रेणीत ८७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आणि' द्वितीय श्रेणीत १३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

गुणानुक्रमे विद्यार्थी व त्यांना मिळालेले एकूण गुण व टक्केवारी पुढील प्रमाणे आहे. सर्व प्रथम कु. सेजल संजय कुलकर्णी हिला ५२९ गुण ८८.१७%, द्वितीय कु. अनुश्री अरविंद महाजन ५२० गुण ८७.६७%, तृतीय कु. साक्षी लक्ष्मण काटे ५२३ गुण ८७.१७% प्राप्त झाले.

वाणिज्य शाखेत ३१३ विद्यार्थी बसलेले होते. यापैकी २८३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, वाणिज्य शाखेचा निकाल ९०.४१ टक्के लागला आहे. त्यापैकी ८६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. प्रथम श्रेणीत ७६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आणि द्वितीय श्रेणीत ७५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गुणानुक्रमे विद्यार्थी व त्यांना मिळालेले एकूण गुण व टक्केवारी पुढील प्रमाणे आहे. सर्व प्रथम अभिषचंद्र श्रेयांस हिरप याला ५७० गुण ९५.००%, द्वितीय कु.अक्षरा शैलेश चौधरी ५६८ गुण ९४.६७% व तृतीय कु. सिद्धी जयप्रकाश साबु ५६७ गुण ९४.५०% प्राप्त झाले.

कला शाखेत १२५ विद्यार्थी बसलेले होते. यापैकी ७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, कला शाखेचा निकाल ५८.४० टक्के लागला आहे. त्यापैकी २ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. प्रथम श्रेणीत ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आणि द्वितीय श्रेणीत ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गुणानुक्रमे विद्यार्थी व त्यांना मिळालेले एकूण गुण व टक्केवारी पुढील प्रमाणे आहे. सर्व प्रथम कु. वैष्णवी शिवाजी नन्नवरे हिला ४९६ गुण ८२.६७%, शेख अलिम सलिम ४५२ गुण ७५.३३% व तृतीय कु. प्रियंका पवन शर्मा ४३४ गुण ७२.३३% प्राप्त झाले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्रीनिवास भक्कड, उपाध्यक्ष फ ुलचंद भक्कड, कोषाध्यक्ष हेमेंद्र लखोटिया, संचालक पन्नालाल बगडिया, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य श्री. पी. सी. बाफना, पर्यवेक्षक श्री. एस. बी. बिक्कड, पर्यवेक्षिका श्रीमती के. के. वासनिक तसेच महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजिक करण्यात आली होती. या बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी सदस्य सचिव सविता चौधर, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी डी.एस. दिवटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डी. जगधने, जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी, अन्न सुरक्षा अधिकारी, समितीवर नियुक्त शासकीय व अशासकीय सदस्य रमेश तारगे, विजय जाधव, सतिश पंच, नंदकुमार देशपांडे, बाबासाहेब सोनटक्के शालिनी पुराणिक, संजय देशपांडे, मधुकर सोनोने, दिलीप लाड, मोहन इंगळे, बालाप्रसादर जेथलिया आदिंची बैठकीस उपस्थिती होती. अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.




# शेतकऱ्यांना मागणीप्रमाणेच बियाणे, खते, औषधी पुरवठा करावा

## खरीप हंगाम नियोजन करून आढावा बैठकीत आ. खोतकर यांच्या सूचना

**जालना । प्रतिनिधी** - शेतकऱ्यांचा महत्वाचा खरीप हंगाम जवळ आलेला असून पाऊस देखील जवळ येऊन ठेपलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्याला लागणारे बी बियाणे व कीटकनाशके व पीक कर्ज संदर्भात अधिकारी कर्मचाऱ्यांनी आतापासूनच तयारीला लागावे व शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना बी बियाणे खते औषधी पिक कर्ज पुरवठा करण्यासाठी तयारीत राहावे अशा स्वरूपाच्या सूचना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना दिल्या. आज दिनांक पाच मे २०२५ रोजी तहसील कार्यालय जालना येथे जालना विधानसभा मतदारसंघाची खरीप हंगाम नियोजन पूर्व आढावा बैठक आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे ,माजी सभापती पांडुरंग डोंगरे ,पंचायत समिती सदस्य जनार्दन चौधरी ,रामकिसन कांयदे तहसीलदार छाया पवार ,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कापसे, तालुका कृषी अधिकारी राठोड, सहाय्यक निबंधक हुसे आदी मन्यवरासह जालना विधानसभा मतदारसंघातील मंडळ अधिकारी कृषी अधिकारी, कृषी सहायक ,ग्रामसेवक, तलाठी इत्यादींचे उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खोतकर म्हणाले की जालना शहर हे बियाण्याची राजधानी असून या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणे बियाण्याचा साठा उपलब्ध आहे. परंतु काही काही ठिकाणी बी बियाणे व औषधेंची कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना फसविण्याचा प्रकार होण्याची शक्यता ना करता येत नाही. त्यासाठी बी बियाणे व इतर वस्तूचा काळाबाजार होणार नाही या संदर्भात बैठकीमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना करण्यात आल्या ,असे आढळून आल्यास कोणालाही माफ करण्यात येणार नसून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचा इशारा देखील आमदार खोतकर यांनी दिला, त्याचप्रमाणे या खरीप हंगामामध्ये बँकांनी देखील शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणे पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करावे. मागेल त्या शेतकऱ्यांना पीक कर्ज मंजूर करण्यासाठी आतापासूनच कामाला लागावे. शासनाकडून देखील शेतकऱ्यांसाठी मोफत बियाण्याचा पुरवठा केला जातो तो सर्वसामान्य शेतकऱ्यापर्यंत पोहोचवीण्याचे काम अधिकारी कर्मचाऱ्यांनी करावे या कामात देखील दिरंगाई होता कामा नये अशा सूचना देखील आमदार खोतकर यांनी दिल्या. या कामी दिरंगाई आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा देखील बैठकीत देण्यात आला.



# मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री शिंदे यांना 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे निमंत्रण

## महोत्सवास उपस्थितीचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे आश्वासन





**मुंबई । प्रतिनिधी** - गोवा येथे होणाऱ्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'साठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांना निमंत्रण देण्यात आले. या निमंत्रणप्रसंगी दोन्ही मान्यवरांनी महोत्सवाला उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले.

सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी नुकतीच मुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी गोव्यातील फोंडा येथील फर्मागुडी अभियंता महाविद्यालयाच्या प्रांगणात १७ ते १९ मे २०२५ दरम्यान होणाऱ्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा' ची माहिती दिली.

या वेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट सांगितले, हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण आहे. मी याचा अवश्य लाभ घेईन. या भेटीदरम्यान श्री. वर्तक यांच्यासमवेत महाराष्ट्र व छत्तीसगड राज्यांचे राज्य संघटक श्री. सुनील घनवट, तसेच भाजपाचे नागपूर येथील आमदार व माजी मंत्री डॉ. परिणय फुके हेही उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांची भेट घेताना राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री श्री. भरतशेठ गोगावले हेही उपस्थित होते. त्यांनाही निमंत्रण देण्यात आले असून ते देखील कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

या महोत्सवात देशभरातील संत, महंत, धर्माचार्य, विचारवंत आणि धर्मप्रेमी नागरिक हजारोंच्या संख्येने सहभागी होणार असून, सनातन राष्ट्राच्या स्थापनेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून हा कार्यक्रम घडवला जात आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.